शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२...

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.१०४९६/२०२३ मधील दिलेल्या निदेशानुसार श्री.विराज लांडगे यांच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याच्या अर्जावर सुनावणी घेवून निर्णय घेण्याबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २६ ऑगस्ट, २०२३

वाचा-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.१४ डिसेंबर, २०२२

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.३१ जानेवारी, २०२३

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.१०४९६/२०२३ मधील दि.२४/८/२०२३चे आदेश

४. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या दिनांक २५/८/२०२३ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना -

श्री.विराज लांडगे यांनी कबड्डी या क्रीडा प्रकाराकरीता सन २०१९-२० या वर्षातील पुरस्काराकरिता अर्ज सादर केला होता. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीने श्री.लांडगे यांच्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व दस्तावेजांची छाननी करून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये विहित करून देण्यात आलेल्या अटीची पुर्तता होत नसल्याने त्यांना पुरस्काराकरीता अपात्र ठरविले होते. शासनाच्या या निर्णयाविरोधात श्री.लांडगे यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१०४९६/२०२३ दाखल केली असता सदर याचिकेबाबत दिनांक २४/०८/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने श्री.लांडगे यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याबाबत विहीत शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून पुनर्विचार करावा असे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने श्री.विराज लांडगे यांच्या प्रकरणी निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश -

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ-३” मधील नियम क्र.६ मधील क्र.६.१ नुसार खेळाडूस पुरस्कार वर्षापासून लगतपूर्व ५ वर्षामध्ये कोणत्याही तीन वर्षात संबंधित खेळाडूने अधिकृत संघातर्फे संबंधित खेळाच्या अधिकृत राष्ट्रीय फेडरेशन मार्फत आयोजित वरिष्ठ गटाच्या (सिनीअर) राष्ट्रीय स्पर्धेमध्ये/राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) मध्ये महाराष्ट्राच्या प्रातिनिधीक संघाकडून सहभागी होवून किमान एक पदक (प्राविण्य) संपादन केले आहे अशा खेळाडूंचा गुणांकना करीता विचार करण्यात येईल. श्री.लांडगे यांच्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व दस्ताऐवजांची छाननी करून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये विहित करून देण्यात आलेल्या अटीची पुर्तता होत नसल्याने त्यांना पुरस्काराकरीता अपात्र ठरविले होते.

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/०८/२०२३ रोजी दूरदृष्यप्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्स) आयोजित केलेल्या बैठकीमध्ये श्री.लांडगे यांनी निदर्शनास आणले की, त्यांनी ६२ व्या, ६३ व्या आणि ६५ व्या वरीष्ठ राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग घेतला आहे. त्यांनी ३ वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेला असल्याने त्यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्यात यावा, असे समितीसमोर म्हणणे मांडले.

३. श्री.लांडगे यांनी सन २०१९-२० या वर्षाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरिता अर्ज केलेला आहे. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देताना संबंधित खेळाडूची पुरस्कार वर्षातील ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षासह लगतपूर्व ५ वर्षातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, वरिष्ठ राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील कामगिरी पुरस्कारासाठी विचारात घेण्यात येते. यानुसार सन २०१९-२० या वर्षाच्या पुरस्कारकरिता दिनांक १ जुलै, २०१५ ते दिनांक ३० जून, २०२० या कालावधीत आयोजित केलेल्या स्पर्धांमधील कामगिरी विचारात घेण्यात येते. श्री.लांडगे यांनी ६२ व्या वरीष्ठ राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर केलेले आहे. सदर स्पर्धेचे आयोजन दि.१४/०१/२०१५ ते दि.१८/०१/२०१५ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे सदर स्पर्धेच्या प्रमाणपत्राचे गुणांकन करण्यात आलेले नाही. यावरून श्री.विराज लांडगे हे पुरस्कारासाठी विचारात घेण्याच्या कालावधीमध्ये फक्त २ वरिष्ठ गटाच्या (सिनीअर) राष्ट्रीय स्पर्धेमध्ये/राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झाले आहेत, हे स्पष्ट होते.

४. श्री.विराज लांडगे यांनी अर्जासोबत ६३ व्या वरीष्ठ राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद स्पर्धा (दि.२४ ते २९ नोव्हेंबर २०१५) आणि ६५ व्या वरीष्ठ राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद स्पर्धा (दि.३१ डिसेंबर २०१७ ते ५ जानेवारी २०१८) या दोन वरीष्ठ राष्ट्रीय स्पर्धांची प्रमाणपत्रे जोडलेली आहेत. सदर प्रमाणपत्रे पुरस्काराकरीता ग्राह्य धरण्यात आलेली आहेत. तथापि, या व्यतिरिक्त पुरस्कारासाठी विचारात घेतलेल्या कालावधीतील अन्य वरिष्ठ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभाग/प्राविण्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडलेले नाहीत. श्री.विराज लांडगे यांनी सन २०१६-१७ आणि २०१७-१८ या दोन वर्षात फेडरेशन कप स्पर्धेत सहभागी होऊन प्राविण्य प्राप्त केलेले आहे. शासन निर्णय

दि.०२/०३/२०२३ मधील तरतूदीनुसार फेडरेशन कप मध्ये सहभागी होऊन प्राविण्य संपादित करणाऱ्या खेळाडूंना संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ ३.५ अनुसार गुण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. यानुसार श्री.विराज लांडगे यांच्या फेडरेशन कप मधील सहभाग व प्राविण्याकरीता त्यांना गुण देण्यात आलेले आहेत. तथापि, सदर स्पर्धांचा केवळ गुणांकनासाठी विचार होत असून नियम क्र.६.१ मध्ये विचारात घ्यावयाच्या स्पर्धांमध्ये समावेश होत नाही.

५. श्री. विराज लांडगे हे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ-३" मधील नियम क्र.६ मधील क्र.६.१ नुसार नियमाची पूर्तता करीत नसल्याने ते कबड्डी या क्रीडा प्रकाराकरीता सन २०१९-२० या वर्षाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरिता पात्र ठरत नाहीत. यामुळे त्यांची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ज्ञानेश्वर आव्हाड)**
कार्यासन अधिकारीमहाराष्ट्र शासन ,

प्रति,

१) मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे खाजगी सचिव

२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,

३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,

४) श्री.विराज लांडगे (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत),

५) सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ.,

६) निवडनस्ती क्रीयुसे-२